# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०८/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

**अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक**
**वाहनासह एकुण ८०९५०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त**

दिनांक १९/०८/२०२४ रोजी पोलीस उमरेड येथील स्टाफ पोलीस स्टेशन उमरेड हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, बायपास चौक उमरेड तसेच गांगापूर उडाण पुलीया उमरेड येथे ०३ ट्रक टिप्परद्वारे रेतीची चोरटी अवैधरीत्या विनारॉयल्टी वाहतूक होत आहे. अशा मिळालेल्या विश्वसनिय माहिती वरून नमुद घटनास्थळी नाकाबंदी केली असता स्टाफसह बायपास चौक उमरेड तसेच गांगापूर उडाण पुलीया उमरेड येथे १) अशोक ले—लॅन्ड कंपनीची एम.एच. ४० बी.जी. ८६७५ चा चालक आरोपी नामे— वाजीद अहमद खान वय २५ वर्ष रा. बाबा ताज मश्जीद के पीछे पहल्ली गल्ली बहादुरा रोड नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहनात ०५ ब्रास रेती अंदाजे कि. २५,०००/— रू तसेच २) टाटा कंपनीची टिप्पर क्र. एम.एच. ४९ ए.टी. ८६७५ चा अनोळखी फरार चालक याने आपल्या ताब्यातील वाहनात ०५ ब्रॉस रेती किंमती २५,००० रू. ३) १२ चाकी टाटा कंपनीचा टीप्पर क्र. एम. एच. ४० बी. एफ. ९८८९ चा चालक आरोपी नामे— सुमीत डवरू दिघोरे वय २२ वर्ष रा. आंबेनेरी ता. चिमुर जि. चंद्रपूर याने आपल्या ताब्यातील वाहनात ०९ ब्रॉस रेती किमंती ४५,००० रू. विना परवाना अवैध्यरित्या रेती वाहतूक करताना मिळून आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून तिन्ही ट्रक टिप्पर मधुन अंदाजे १९ ब्रास रेती किंमती ९५,०००/—रू. व तिन ट्रक टिप्परची किंमती ८००००००/—रू. असा एकुण ८०९५०००/—रू. चा मुद्देमाल अवैधरीत्या विनापरवाना वाहतूक करतांना मिळुन आल्याने घटनास्थळावरून जप्त करण्यात आला. आरोपी क्र. ०१ व ०३ यांना अटक करण्यात आली. अवैद्यरित्या विनापरवाना शासनाचा महसूल बूडवून रेती भरून सार्वजनीक मालमत्तेचे नूकसान करून रेतीची चोरटी वाहतूक करतांना मिळून आल्याने आरोपीतांविरूद्ध कलम ३०३(२) भा.न्याय संहिता, ४८(७), ४८(८),म.जमीन महसूल संहिता ४ ,२१ खाण खनिज अधिनियम, ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक १३०, १७७ मोटरवाहन अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आलेला असुन पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे उमरेड येथील ठाणेदार पोनि अनिल राउत, पोहवा प्रदीप चवरे, राधेशाम कांबळे, पोना पंकज बट्टे, पोअं. गोवर्धन सहारे, तुषार गजभिये यांनी पार पाडली.

# खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना खापरखेडा पोलीसांनी केले अटक

दिनांक १८/०८/२०२४ रोजी फिर्यादी नामे– लल्लु रहीमआले यादव वय ३५ वर्ष रा. क्वार्टर नं १५४ नविन कॉलनी चनकापुर ग्राउंड समोर ता. सावनेर हे मिलन चौक चनकापुर येथील पुजा बार रेस्टॉरेंट येथे मॅनेजर म्हणुन काम करतात. फिर्यादी हे पुजा बार रेस्टॉरेंट येथे कामावर हजर असतांना यातील **आरोपी नामे– १) ओमप्रकाश शिवेदी वय २३ वर्ष २) हर्षित वर्मा वय अंदाजे २४ वर्ष दोन्ही रा. खापरखेडा** हे बारमध्ये येवुन बॉबी कहॉ है! असे म्हणुन फिर्यादीचा सोबत असलेला वेटर यास शिवीगाळ करून गल्ल्यात कीती पैसे आहेत असे म्हणुन दोन्ही आरोपी पैकी एका आरोपीने धारधार सत्तुर काढुन फिर्यादीला मारण्याच्या उद्देशाने फिर्यादीचा अंगावर वार करून जिवानीशी ठार करण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच पोलीस स्टेशन खापरखेडा येथील डीबी पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचुन **आरोपी नामे– १) ओमप्रकाश शिवेदी वय २३ वर्ष २) हर्षित वर्मा वय अंदाजे २४ वर्ष दोन्ही रा. खापरखेडा** यांना चनकापुर खापरखेडा येथुन ताब्यात घेवुन आज दि. १९/०८/२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापरखेडा येथील ठाणेदार पोनि श्री. धनाजी जळक, पोउपनि प्रशांत खोब्रागडे, पोहवा शैलेश यादव, प्रफुल राठोड, मुकेश वाघाडे, राजू भोयर, राजकुमार सातुर, कविता गोंडाणे यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**